वस्त्रोद्योग धोरणांतर्गत योजना केंद्र पुरस्कृत TUFS योजनेशी असंलग्न (De-Link) करण्याबाबत खुलासा

# महाराष्ट्र शासन

सहकार ,पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन परिपत्रक क्र.धोरण-२०१४/प्र.क्र.१७६/टेक्स-५

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२

दि.१ नोव्हेंबर,२०१४

वाचा -१) शासन निर्णय ,सपववि क्र. धोरण- २०११/प्र.क्र.३३५/टेक्स-२ दि.२ जानेवारी,२०१२

२) शासन निर्णय ,सपववि क्र. धोरण- २०१२/प्र.क्र.१/टेक्स-२ दि.१ मार्च,२०१२

३) शासन निर्णय ,सपववि क्र. धोरण- २०१२/प्र.क्र.२/टेक्स-२ दि.१ मार्च,२०१२

४) शासन निर्णय ,सपववि क्र.धोरण- २०१२/ प्र.क्र.१०/टेक्स-२, दि.१५ मार्च,२०१२

५) शासन निर्णय ,सपववि क्र. धोरण- २०१२/प्र.क्र.२५७/टेक्स-२ दि.२१ फेब्रुवारी,२०१४

**प्रस्तावना-**

महाराष्ट्र राज्याचे नवीन वस्त्रोद्योग धोरण संदर्भ क्र.१ येथिल शासन निर्णयान्वये जाहिर करण्यात आले आहे. या धोरणांतर्गत दीर्घ मुदती कर्जाशी निगडीत व्याज सवलत,विदर्भ,मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील नवीन व विस्तारीकरणाच्या वस्त्रोद्योग घटकांच्या प्रकल्पांना १०% भांडवली सवलत आणि अनुसूचित जाती/जमाती व अल्पसंख्यांक समाजांच्या यंत्रमाग घटकांच्या आधुनिकिकरणाच्या प्रकल्पांना १०% भांडवली सवलत या प्रमुख योजना आहेत.या सर्व योजना केंद्र शासन पुरस्कृत Technology Upgradation Funds Schemes (TUFS) या योजनेशी संलग्न करण्यात आल्या होत्या. त्यानंतर संदर्भ क्र.५ येथिल शासन निर्णयान्वये राज्य वस्त्रोद्योग धोरणांतर्गत देण्यात येणा-या व्याज व भांडवली सवलत योजना केंद्र शासन पुरस्कृत TUFS योजनेशी असंलग्न

Scanned by CamScanner

(Delinked ) करण्यात येऊन राज्य वस्त्रोद्योग धोरणांतर्गत लाभांस पात्र ठरण्यासाठी वस्त्र आयुक्त ,भारत सरकार यांच्याकडून UID क्रमांक प्राप्त करून घेण्याची अट शिथिल करण्यात आली आहे.

संदर्भ क्र. ५ येथिल शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेले आदेश सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकास किंवा त्यानंतर वित्तीय संस्थांनी कर्ज मंजूर केलेल्या वस्त्रोद्योग घटकांना लागू राहतील असे सदर शासन निर्णयातील परि.१ (क) मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.तथापि, ज्या वस्त्रोद्योग घटकांना बँकांनी/ वित्तीय संस्थांनी दि.१ एप्रिल,२०११ ते २० फेब्रुवारी,२०१४ या कालावधीत कर्ज मंजूर केले आहे, परंतू त्यांना वस्त्र आयुक्त,भारत सरकार यांच्याकडून UID क्रमांक दि.२१ फेब्रुारी ,२०१४ अथवा त्यानंतर मिळाला आहे अशा वस्त्रोद्योग घटकांना संदर्भ क्रमांक ५ येथिल शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेले लागू होतील किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात येत होती.त्यामुळे याबाबत अधिक स्पष्टिकरण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**परिपत्रक-** उपरोक्त माहिती विचारात घेता याबाबत खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे-

१) व्याज सवलतीच्या प्रकरणी ज्या वस्त्रोद्योग घटकांना बँकांनी/ वित्तीय संस्थांनी दि.१ एप्रिल,२०११ ते २० फेब्रुवारी,२०१४ या कालावधीत कर्ज मंजूर केले असेल व त्यांना वस्त्र आयुक्त,भारत सरकार यांच्याकडून UID क्रमांक दि.२१ फेब्रुवारी ,२०१४ पुर्वी अथवा त्यानंतर मिळाला असेल अशा वस्त्रोद्योग घटकांना संदर्भ क्रमांक २ येथिल शासन निर्णय लागू राहील.

२) विदर्भ,मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील भांडवली सवलतीच्या प्रकरणी ज्या वस्त्रोद्योग घटकांना बँकांनी/ वित्तीय संस्थांनी दि.१ मार्च,२०१२ ते २० फेब्रुवारी,२०१४ या कालावधीत कर्ज मंजूर केले असेल व त्यांना वस्त्र आयुक्त,भारत सरकार यांच्याकडून UID क्रमांक दि.२१ फेब्रुवारी ,२०१४ पुर्वी अथवा त्यानंतर मिळाला असेल अशा वस्त्रोद्योग घटकांना संदर्भ क्रमांक ३ येथिल शासन निर्णय लागू राहील.

३) अनुसूचित जाती/जमाती व अल्पसंख्यांक समाजांच्या यंत्रमाग घटकांच्या भांडवली सवलतीच्या प्रकरणी ज्या वस्त्रोद्योग घटकांना बँकांनी/ वित्तीय संस्थांनी दि.१५ मार्च,२०१२ ते २०

Scanned by CamScanner

फेब्रुवारी,२०१४ या कालावधीत कर्ज मंजूर केले आहे व त्यांना वस्त्र आयुक्त,भारत सरकार यांच्याकडून UID क्रमांक दि.२१ फेब्रुवारी ,२०१४ पुर्वी अथवा त्यानंतर मिळाला असेल अशा वस्त्रोद्योग घटकांना संदर्भ क्रमांक ४ येथिल शासन निर्णय लागू राहील.

४) दि.२१ फेब्रूवारी,२०१४ अथवा त्यानंतर वित्तीय संस्थांनी कर्ज मंजूर केलेल्या वस्त्रोद्योग घटकांना संदर्भ क्र.५ येथिल शासन निर्णय लागू राहील.

२. संचालक,वस्त्रोद्योग ,म.रा.यांनी या सुचना संबंधित वस्त्रोद्योग घटक व वित्तीय संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( र.अं.खडसे )
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,

| | |
|---|---|
| मा.राज्यपाल यांचे सचिव. | संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर. |
| मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई. | संचालक, समाज कल्याण, पुणे. |
| मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई. | आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक |
| सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री (खाजगी सचिवामार्फत), मंत्रालय,मुंबई.. | आयुक्त, अल्पसंख्यांक विकास, मुंबई |
| मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.. | आयुक्त(वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली. |
| नियोजन विभाग, वित्त विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, आदिवासी विकास, अल्पसंख्यांक विकास, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.. | सर्व जिल्हा उद्योग अधिकारी. |
| महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१/२, मुंबई./नागपूर | अध्यक्ष/मुख्य व्यवस्थापकीय संचालक, आय.डी.बी.आय. बँक, एस.आय.डी.बी.आय.बँक व केंद्र पुरस्कृत TUF योजनेअंतर्गत सर्व नोडल बँक. |
| महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१/२, मुंबई./नागपूर | सर्व प्रादेशिक उप संचालक वस्त्रोद्योग. |
| | सर्व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था. |
| | निवड नस्ती (टेक्स-५) |

Scanned by CamScanner